www.aiche.org/ccps

Process Safety Beacon

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx

उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक

www.iomosaic.com

# भोपाळ – इतिहासातील सर्वात भीषण औद्योगिक दुर्घटना

डिसेंबर २०१४













वरः कारखान्यातील एका नियंत्रण कक्षातील फलक (सुरक्षा हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे)







टीपः सर्व छायाचित्रे भोपाळमधील कारखान्याची डिसेंबर 2004 मधील आहेत

३ डिसेंबर १९८४ (३० वर्षांपूर्वी) रोजी मध्यरात्रीनंतर लगेचच भारतातील भोपाळमधील एका कीटकनाशक कारखान्यातून सुमारे ४० टन मिथाईल आयसोसायनेट (एमआयसी) या विषारी वायूची वातावरणात गळती झाली. या दुर्घटनेमुळे हजारो लोकांचा मृत्यू, लाखो लोक जखमी त्याचबरोबर दीर्घकालीन आरोग्य, पर्यावरणीय व आर्थिक परीणाम झाले. ही घटना इतिहासातील सर्वात भीषण औद्योगिक दुर्घटना म्हणून ओळखली जाते.

असे म्हणतात की एमआयसीच्या ई–६१०(१) या साठा टाकीत पाणी गेले. एक उष्मादायक अभिक्रीया घडली ज्यामुळे टाकीतील तापमान व दाब वाढला व टाकीचा रिलीफ व्हॉल्व्ह उघडला. त्या ठिकाणची व नियंत्रण कक्षातील(२) काही महत्वाची उपकरणे व्यवस्थित काम करीत नव्हती. एक प्रशीतन संयंत्र (३) बंद होते व त्यातील प्रशीतक काढून टाकण्यात आला होता. रिलीफ व्हॉल्व्हमधून सुटलेला वायू कॉस्टीक स्क्रबरमध्ये (४) वाहीला जो देखभालीसाठी बंद ठेवण्यात आला होता. तेथून तो वायू पलीत्याकडे (५) वाहीला जोदेखील गंजलेल्या वाहीन्या बदलण्याची वाट पहात बंद होता. कोणतीही प्रक्रीया न होता वायू शेकडो हजारो लोकांना बाधित करीत वातावरणात पसरला.

कारखान्यातील आरेखन, व्यवस्थापन, सुरक्षा संस्कृती आणि संयंत्रे चालविण्यात अनेक दोष होते ज्यांचा या दुर्घटनेत सहभाग होता. इंटरनेटवर तुम्हाला अनेक संकेतस्थळांवर या घटनेची विस्तृत माहिती मिळेल. या महिन्यात या घटनेविषयी माहिती मिळविण्यासाठी वेळ काढा व तुमच्या कार्यस्थळाच्या अनुषंगाने त्याचा अर्थ लावा.

## आपण काय करू शकता ?

तुमच्या कारखान्यातील वरीष्ठ अधिकारी, कारखाना व्यवस्थापन, अभियंते आणि तांत्रिक व्यक्ति, स्थानिक व्यवस्थापन, पर्यवेक्षक आणि मुकादम, कामगार आणि दुरूस्ती कामगार, आणि अगदी कार्यालयीन आणि सेवक कामगार याच्यासह प्रत्येकजण खालील प्रश्नांची उत्तरे देवू शकला पाहिजे. साहजिकच व्यक्तिच्या कामाच्या स्वरूपानुसार उत्तरांमध्ये तफावत असेल पण प्रत्येकाने भोपाळसारखी दुर्घटना टाळण्यातील त्याची भूमिका ओळखलीच पाहीजे.

❖माझ्या कामाच्या ठिकाणी आणि माझ्या कामात कोणती गंभीर घटना घडू शकते?
❖अशी घटना घडू नये म्हणून कोणत्या यंत्रणा अस्तित्वात आहेत (प्रतिबंधात्मक यंत्रणा)?
❖या प्रतिबंधात्मक यंत्रणा पुरेशा आहेत व व्यवस्थित चालू आहेत हे मला कसे समजेल?
❖त्यातूनही अशी घटना घडलीच तर तिचा मुकाबला करण्यासाठी कोणती यंत्रणा अस्तित्वात आहेत (उपशमनात्मक यंत्रणा)
❖या उपशमनात्मक यंत्रणा पुरेशा आहेत व व्यवस्थित चालू आहेत हे मला कसे समजेल?
❖भोपाळ दुर्घटनेत झाल्याप्रमाणे एखादी प्रतिबंधात्मक किंवा उपशमनात्मक यंत्रणा उपमार्गित किंवा बंद केली आहे?
❖या प्रतिबंधात्मक किंवा उपशमनात्मक यंत्रणा व्यवस्थित कार्यान्वित असल्याची खात्री करण्यात माझी भूमिका कोणती?

## आपत्ती टाळण्यातील तुमची जबाबदारी पूर्ण करा!

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा ६४६–४९५–१३७१

हे बीकॉन सहसा अरेबिक, अफ्रीकन, चिनी, झेक, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, इटालियन, जपानी, कोरियन, मलय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रोमानियन, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तेलगू, थाई, तुर्की, आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.